(11)

# वरळी सागर को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि. मुंबई.

[ नोंदणी क्र. बीओएम/एचएसजी/जीएन/६५४५/८३ ]

कार्यालय:- तळमजला, पूर्णा, ६८-६९, सर पोचखानवाला रोड, वरळी हिल ईस्टेट, वरळी, मुंबई - ४०० ०२५.

दूरध्वनी क्रमांक:- ४९२००१८ दिनांक: 14 OCT 1990

प्रति, डॉ. पद्मसिंह बा. पाटील

महोदय ,

आपण वरळी सागर को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि., हया महाराष्ट्र को-ऑपरेटिव्ह सोसायटीज् ॲक्ट, १९६०, नुसार नोंदणीकृत झालेल्या संस्थेचे सभासद आहात. आपणास कळविण्यांत येते की, व्यवस्थापक समितीच्या दि. ९/१०/१९९० च्या सभेच्या ठराव क्रमांक ३ नुसार आपला संस्थेच्या रेकॉर्डप्रमाणे असणारा जेष्ठतानुक्रम लक्षात घेऊन आपणास " वेलरणा " मधील फ्लॅट क्रमांक "११०१" संस्थेचे पोटनियम व वेळोवेळी अस्तित्वात असलेले नियम यांना पात्र राहून ॲलॉट केला आहे.

सदर गाळा हा केवळ निवासीय शांततापूर्ण रहिवासासाठी [ Peaceful Residential Occupation ] आहे यांची नोंद घ्यावी. हया प्रयोजनाशिवाय गाळ्याचा वापरविषयीचा कोणताही बदल व्यवस्थापक समितीच्या लेखी पूर्वपरवानगीशिवाय करता येणार नाही.

संस्थेच्या दफतरी जोपर्यन्त आपण भाडेकरू सभासद आहात व सदर गाळा तुमच्या नावावर आहे तोपर्यन्त संस्थेच्या उपविधितील तरतूदी व संस्थेच्या पुढील नियम, अटी व शर्ती हयास अधिन राहून आपणास गाळा ॲलॉट करण्यात येत आहे. हया नियम, अटी व शर्ती म्हणजे गाळा किंवा त्याचा कोणताही भाग कोणत्याही पध्दतीने इतरास वापरास देणे अथवा कोणत्याही पध्दतीने गाळ्याचा कबजा सोडणे, तसेच सभासदाने गाळा सुस्थितीत ठेवणे, त्याची दुरुस्ती करणे, गाळयात जादा बांधकाम करणे किंवा कोणतेही फेरफार करणे, कोणत्याही प्रकारे संस्थेच्या सभासदांना गैरसोय, त्रास, कटकट करण्याचे टाळणे, गाळ्यात ज्वालाग्रही किंवा ऊबगवणे पदार्थ किंवा ज्याच्या साठवणीकरीता कोणत्याही कायद्यान्वये योग्य प्राधिका-यांची परवानगी लागते असा इतर माल ठेवणे किंवा साठवणें, एकापेक्षा अधिक गाळे धारण करण्याबाबतचे निर्बंध, संस्थेची आकारणी देणे, ज्यासाठी, गाळा दिला आहे, त्याच प्रयोजनासाठी त्याचा वापर करणे, वापरात बदल करणे, हयासंबंधी संस्थेचे उपविधि व त्यासोबत असलेल्या नमूना "अ" मधील अटी, शर्ती व नियम इया सर्वांचे काटेकोरपणे पालन.